# उज्जीवन फायनान्शियलचा आयपीओ २८ एप्रिलला खुला

**मुंबई :** उज्जीवन फायनान्शियल सर्व्हिसेस बँकिंग फायनान्शियल कंपनी म्हणून 2005 मध्ये सुरू झाली. 31 डिसेंबर 2015 रोजी यूएफएस कंपनीचे कार्य 24 राज्यांमध्ये आणि केंद्रशासित प्रदेशात, तसेच भारताच्या 209 जिल्ह्यांमध्ये पोहोचले असून या माध्यमातून सुमारे 2.77 दशलक्ष कार्यशील ग्राहकांना 470 शाखांद्वारे आणि 7,862 कर्मचाऱ्यांच्या मदतीने सेवा दिली जाते आहे. या संदर्भातील आयपीओ खुला होण्याची तारीख 28 एप्रिल आणि बंद होण्याची तारीख 2 मे असेल. किंमत रु. 207 TO 210 प्रति इक्विटी शेअर 10 दर्शनी मूल्य इतके राहील.